# नियमित दिवाणी दावा क्र.२४०/२०२४ मधील अर्ज (नि.क्र.२९) वरील आदेश
# (लक्ष्मीबाई वि. निर्मला व इतर)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे विरुद्ध झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द होवून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ यांच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार, प्रतिवादी क्र.१ ही महिला आहे. सदर दाव्याचे समन्स मिळाल्यानंतर ती दाव्यात हजर झाली. परंतु, म्हणणे देणेकामी कागदपत्र मिळविण्यास फार कालावधी लागला. प्रतिवादीच्या कुटूंबातील सदस्यांची आजारपणे चालू होती. घरगुती अडचणी व आजारपण यामुळे तिला वेळेत कैफियत देता आली नाही. त्यामुळे दाव्यातील तिच्याविरुद्ध झालेला 'विना कैफियत'चा आदेश रद्द होवून कैफियत देण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली.

३. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज नाकारला आहे. प्रतिवादी यांनी अर्जात दिलेले कारण योग्य नसून प्रतिवादी हे दाव्याचे कामकाज जाणून बुजून लांबवितात. करीता प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करणेची विनंती केली आहे. विकल्पाने प्रतिवादीस जास्तीत जास्त दंड करण्याची विनंती केली आहे.

४. प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीं विरुद्ध वाटप होवून मिळणेसाठी दाखल केला असल्याचे दिसून येत आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १ यांना दि.०२.०४.२०२५ रोजी दाव्याचे समन्सची बजावणी झाल्याचे दिसून येते. परंतु, ते न्यायालयात हजर होवून त्यांनी मुदतीत म्हणणे दाखल केलेले नाही. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादींविरुद्ध वाटपाची मागणी केली असल्यामुळे प्रस्तुत दाव्यामध्ये वादीचे हक्क व हितसंबंध दिसून येत आहेत. त्यामुळे प्रतिवादींना लेखी कैफियत सादर करुन त्यांची बाजू मांडण्यास संधी देणे नैसर्गिक न्यायतत्वाच्या कारणामुळे न्यायोचित दिसून येत आहे. प्रतिवादी क्र. १ यांना कैफियत सादर करण्यास परवानगी दिल्यास वादी याचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, कैफियत सादर करण्यास परवानगी दिल्यास प्रस्तुतचा दावा गुणदोषावर चालून निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांना त्यांची कैफियत सादर करुन त्यांची बाजू मांडण्यास संधी देणे

न्यायोचित दिसून येत आहे. परंतु, प्रतिवादी क्र.१ यांनी कैफियत देण्यासाठी केलेला विलंब विचारात घेता प्रतिवादींनी वादी हिस खर्चाची र.रु.१०००/– देणे न्यायोचित वाटते. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी क्र.१ चा सदरचा अर्ज हा खर्च/कॉस्ट र.रु.१०००/– वादीला पुढील तारखेला किंवा तत्पूर्वी देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. सदर खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १ यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

ANIL SITARAM SATOTE
Digitally signed by ANIL SITARAM SATOTE
Date: 2025.11.17 16:20:52 +0530

फलटण. ( ए. एस. साटोटे )

दिनांकः–१७.११.२०२५ २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फलटण